# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः07.08.2026** **वारःशुक्रवार**

---

1. आत्मनिर्भर भारताच्या उभारणीसाठी हातमाग विणकरांना प्रोत्साहन देण्याचं पंतप्रधानांचं आवाहन
2. राष्ट्रीय हातमाग दिवसानिमित्त आज नवी दिल्लीत राष्ट्रीय हातमाग पुरस्कारांचं वितरण होणार
3. स्वच्छ ऊर्जा क्षेत्रातील गोबरधन योजनेला केंद्रीय मंत्रीमंडळाची मंजुरी
4. अग्नी-4 बॅलिस्टिक क्षेपणास्त्राची चाचणी यशस्वी आणि
5. आसाममध्ये पुरामुळे आतापर्यंत 97 जणांचा मृत्यू

**पंतप्रधान हातमाग दिवस**

आजचा राष्ट्रीय हातमाग दिवस सर्व नागरिकांनी उत्साहानं साजरा करावा असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. आत्मनिर्भर भारताच्या उभारणीसाठी स्वतःच्या हातानं कापड विणणाऱ्या विणकरांना आणि त्यांच्या कुटुंबियांना मदत करण्याचं आवाहन त्यांनी व्हिडीओ संदेशाद्वारे केलं आहे. नागरिकांनी हातमागावरील किमान एक तरी उत्पादन खरेदी करावं आणि त्याचा व्हिडीओ तयार करुन तो प्रसारित करावा. यामुळे देशातील कारागीरांच्या कलेला जागतिक स्तरावर ओळख मिळेल असं मोदींनी या संदेशात म्हटलं आहे.

**हातमाग दिवस**

राष्ट्रीय हातमाग दिवस आज देशभरात साजरा केला जात आहे. 7 ऑगस्ट 1905 रोजी भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा एक भाग म्हणून स्वदेशी चळवळ सुरू करण्यात आली ही. त्याची आठवण म्हणून दरवर्षी 7 ऑगस्टला राष्ट्रीय हातमाग दिवस साजरा केला जातो. यानिमित्त वस्त्रोद्योग मंत्रालयानं आज राष्ट्रपती भवनातील सांस्कृतिक केंद्रात एक विशेष कार्यक्रम आयोजित केला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहतील. भारताला लाभलेला समृद्ध हातमाग वारसा साजरा करतानाच देशाच्या सांस्कृतिक तसंच आर्थिक विकासातील हातमाग उद्योगाच्या योगदानाचा सन्मान करण्याच्या उद्देशानं हा कार्यक्रम आयोजित केल्याचं वस्त्रोद्योग मंत्रालयानं म्हटलं आहे.या कार्यक्रमात संत कबीर हातमाग पुरस्कार आणि राष्ट्रीय हातमाग पुरस्कार प्रदान केले जातील. तसंच चार विशेष टपाल तिकीटांचं आणि अर्थ-रूट-थ्रेड-अल डाईड हँडलूम टेक्स्टाइल्स ऑफ सेंट्रल इंडिया आणि हँडलूम ॲवॉर्डस या दोन पुस्तकांचं प्रकाशन या कार्यक्रमात केलं जाणार आहे. यावेळी हातमाग उत्पादनांचं प्रदर्शनही आयोजित करण्यात आलं आहे.

**केंद्रीय मंत्रिमंडळ निर्णय-गोबरधन**

केंद्रीय मंत्रिमंडळानं काल 23 हजार 731 कोटी रुपयांच्या एकंदर तरतुदीसह 'गोबरधन' या राष्ट्रीय चक्रीय जैव-ऊर्जा योजनेला मंजुरी दिली. 'गोबरधन' ही योजना भारताच्या देशाच्या स्वच्छ ऊर्जा प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा असून, यातून सुमारे दीड लाख रोजगारनिर्मिती होण्याची अपेक्षा असल्याचं केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत सांगितलं. ही योजना 2026-27 ते 2035-36 या कालावधीत राबविली जाईल. देशांतर्गत बायोगॅस उत्पादनात दहापट वाढ करणं, या क्षेत्रात खाजगी गुंतवणूक आकर्षित करणं आणि देशव्यापी चक्रीय जैव-अर्थव्यवस्था निर्माण करणं हे या योजनेचे उद्दिष्ट आहे.

**केंद्रीय मंत्रिमंडळ निर्णय**

आर्थिक व्यवहारविषयक मंत्रिमंडळ समितीनं आसाममधील गुवाहाटीजवळील 'बाइहाटा चारियाली' ते तेजपूर दरम्यानच्या 135 किलोमीटर लांबीच्या 4-पदरी महामार्गाच्या बांधकामालाही मंजुरी दिली; या प्रकल्पासाठी 8 हजार 9 शे 70 कोटी रुपये इतका खर्च येणार असून हा प्रकल्प बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा या तत्त्वावर विकसित केला जाईल.

**लोकसभा-पेमेंट विधेयक**

यूपीआय आणि इतर इलेक्ट्रॉनिक पेमेंट पद्धतींद्वारे केल्या जाणाऱ्या व्यवहारांवर शुल्क आकारण्याची मुभा देणारं विधेयक काल लोकसभेत मंजूर करण्यात आलं. ग्राहकांसाठी आणि लघु उद्योगांसाठी डिजिटल पेमेंट सेवांवर अल्प शुल्क आकारणं आणि त्याच वेळी डिजिटल पेमेंट परिसंस्था चालवणाऱ्या बँका, पेमेंट सेवा पुरवठादार आणि पेमेंट पायाभूत सुविधा कंपन्यांसाठी शाश्वत महसूल प्रारूप सुनिश्चित करणे, हा या विधेयकाचा उद्देश आहे.

**ब्रिक्स-वेव्हज-बाजार**

'ब्रिक्स वेव्हज बाजार' परिषदेला काल मुंबईत सुरुवात झाली. दोन दिवसंचया या परिषदेत ब्रिक्स सदस्य आणि भागीदार देशांतल्या 500 हून अधिक प्रतिनिधींनी भाग घेतला आहे. दृकश्राव्य आणि सर्जनशील उद्योगांमध्ये संवाद, ज्ञानाची देवाणघेवाण करून सदस्य देशांमधले सहकार्य मजबूत करणे हे या परिषदेचं उद्दिष्ट आहे. या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी माहिती आणि प्रसारण सचिव चंचल कुमार, महाराष्ट्राचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार आणि इफ्फीचे महोत्सव संचालक आशुतोष गोवारीकर उपस्थित होते.

**अग्नी-4**

अग्नी-4 या मध्यम पल्ल्याच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्राची काल यशस्वी चाचणी घेण्यात आली. ओडिशातल्या चंदीपूर इथल्या एकात्मिक चाचणी केंद्रातून या क्षेपणास्त्राचं प्रक्षेपण झालं. ही यशस्वी प्रक्षेपण चाचणी देशाच्या सामरिक प्रतिबंधक क्षमता मजबूत करण्याच्या दिशेनं एक महत्त्वाचा टप्पा आहे, असं संरक्षण मंत्रालयानं सांगितलं. या यशस्वी मोहिमेबद्दल स्ट्रॅटेजिक फोर्सेस कमांड आणि डीआरडीओचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी अभिनंदन केलं आहे.

**डोनाल्ड ट्रम्प**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जन्मसिद्ध नागरिकत्वावर निर्बंध घालणं आणि 'बर्थ टुरिझम'ला आळा घालणं या उद्देशानं दोन कार्यकारी आदेशांवर स्वाक्षरी केली आहे. तसंच याबाबतच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर ट्रम्प यांनी निराशा व्यक्त केली असून आपलं प्रशासन अमेरिकेच्या स्थलांतरण प्रणालीत मोठी कारवाई करत आहे, असंही ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

**बंदर सुरक्षा**

देशातल्या बंदरांचं मूल्यमापन केवळ मालवाहतूक, कार्यक्षमता यानुसार नाही तर सध्याच्या सुरक्षाविषयक धोक्यांचा सामना करण्याच्या कार्यक्षमतेनुसार केलं जावं असं बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी म्हटलं आहे. दुसऱ्या राष्ट्रीय बंदरे सुरक्षा परिषदेत ते काल नवी दिल्लीत बोलत होते. देशाच्या सागरी सुरक्षा रचनेत तंत्रज्ञानाधारित बदल करण्याचं आवाहन त्यांनी केलं. सुरक्षित बंदरांमुळे व्यापार मजबूत होतो, मजबूत व्यापार भक्कम अर्थव्यवस्था निर्माण करतो आणि भक्कम अर्थव्यवस्थेतून समर्थ राष्ट्र घडतं असंही त्यांनी सांगितलं.

**झारखंड-विद्यार्थी आंदोलन**

झारखंडमधील भरती परीक्षांमधील कथित अनियमिततेबाबत सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा आज 14 वा दिवस आहे. रांची इथं सहा आंदोलकांचं उपोषण सुरू आहे.मात्र राज्य सरकारकडून चर्चेसाठी अजून कोणतेही निमंत्रण मिळालं नसल्याचा दावा विद्यार्थी आंदोलकांनी काल केला. या आंदोलनाचे पडसाद काल झारखंड विधानसभेतही उमटले.अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी विरोधी पक्षाच्या आमदारांनी विधानसभेच्या आवारात घोषणाबाजी केली.तर मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी आंदोलकांशी चर्चा करण्यासाठी आपल्या सरकारचे दरवाजे खुले असल्याचं सांगितलं आहे. दरम्यान झारखंड सरकारनं 13 ऑगस्टपर्यंत पेपरफुटी आणि भरती प्रक्रियेतील अनियमिततेबाबत कोणताही निर्णय घेतला नाही, तर विद्यार्थ्यांच्या उपोषणात सहभागी होण्याचा इशारा भाजपचे खासदार निशिकांत दुबे यांनी दिला आहे.

**डॉक्टर संप**

मुंबई उच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर 'महाराष्ट्र असोसिएशन ऑफ रेसिडेंट डॉक्टर्स' आणि इंडियन मेडिकल असोसिएशनचा संप काल मागं घेण्यात आला. होमिओपॅथी डॉक्टरांच्या महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमधील नोंदणीच्या मुद्द्यावरून हा संप पुकारण्यात आला होता. मात्र, रुग्णांच्या जीवाशी खेळून आंदोलन करता येणार नाही, असं स्पष्ट करत मुंबई उच्च न्यायालयानं

निवासी डॉक्टरांना तातडीनं कामावर रुजू होण्याचे निर्देश दिले. संप सुरू राहिल्यास डॉक्टराचं वेतन रोखण्याचाही इशाराही न्यायालयानं दिला होता. या प्रकरणात

भविष्यात डॉक्टरांच्या संपाबाबत मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यासाठी वरिष्ठ वकील विनीत नाईक आणि ॲडव्होकेट अमोघ सिंग यांची न्यायालयाने न्यायमित्र म्हणून नियुक्ती केली आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी 8 सप्टेंबर रोजी होणार आहे. दरम्यान, बीएचएमएस-सीसीएमपी पात्र होमिओपॅथिक डॉक्टरांची महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमधील नोंदणी ही मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आणि विद्यमान कायद्याच्या चौकटीत सुरू करण्यात आली असून, ती पुढेही नियमानुसार सुरू राहील, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं.

**<u>गोवा</u>**

'गोवा राज्यातील विधानसभा मतदारसंघांमधील अनुसूचित जमातींच्या प्रतिनिधित्वाचं पुनर्नियोजन कायदा, 2025' लागू केल्याची अधिसूचना केंद्र सरकारनं जारी केली आहे. यामुळं गोव्यातल्या विधानसभा जागा अनुसूचित जमातींसाठी राखीव ठेवण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. 'द गॅझेट ऑफ इंडिया'मध्ये प्रकाशित झालेल्या अधिसूचनेनुसार, हा कायदा कालपासून अंमलात आला आहे.या कायद्यामुळं गोव्यातील आदिवासी समुदायांची दीर्घकाळापासून प्रलंबित असलेली मागणी पूर्ण झाली असून, मतदारसंघांचं पुनर्नियोजन आणि आरक्षण प्रक्रिया सुरू होण्यास मदत होणार आहे,असं गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी म्हटलं आहे. हा कायदा प्रत्यक्षात आणल्याबद्दल डॉ. सावंत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे आभार मानले.

**<u>महिला क्रिकेट</u>**

आशियाक्रिकेट परिषदेनं काल महिलांच्या आशिया करंडक क्रिकेट स्पर्धेचं वेळापत्रक जाहीरकेलं. 28 ऑगस्टपासून दुबईत सुरू होणाऱ्या 20 षटकांच्या सामन्यांच्या या स्पर्धेत भारतआणि पाकिस्तान यांच्यातल्या सामना दुबई इथं 5 सप्टेंबर रोजी खेळला जाणार आहे.

**<u>केरळ-पाऊस</u>**

भारतीय हवामान विभागानं संपूर्ण केरळमध्ये आज मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. केरळमधील पथानामथिट्टा, कोट्टायम आणि इडुक्की जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी अति मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

**<u>आसामपूर</u>**

आसाममध्ये पुरामुळे आतापर्यंत 97 जणांचा मृत्यू झाला आहे तर 15 जिल्ह्यातल्या 1 लाख 68 हजार नागरिकांना पुराचा फटका बसला आहे. राज्यातल्या 480 गावांमधला पूर अजूनही ओसरलेला नाही.

**<u>हवामान</u>**

भारतीय हवामान विभागानं आज कर्नाटक, पूर्व मध्य प्रदेश, राजस्थान, केरळ, आणि ओडिशाच्या काही भागांत मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. तसंच, ईशान्य भारत, दिल्ली, हरियाणा, चंदीगड, अंदमान आणि निकोबार बेटे, पश्चिम बंगालच्या काही भागांतही दिवसभरात मध्यम ते मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.